ISSN:3108-253X
Special Issue : February,2026

RAAVI

An International Journal of Multidisciplinary Research

# ए आय आणि लोकशाही प्रक्रिया

**प्रा. धुळदेव शंकर वाघमोडे**

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग

विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब-वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे

---

**प्रस्तावना-**

आज २१ व्या शतकामध्ये वाटचाल करताना तंत्रज्ञानाच्या जगाने अनेक स्थित्यंतरे पाहिली, पण 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (ए आय) नावाच्या लाटेने मानवी संस्कृतीच्या पायालाच हात घातला आहे. चॅटजीपीटी च्या आगमनानंतर सुरू झालेली ही धाव आता अशा वळणावर येऊन ठेपली आहे. जिथे तंत्रज्ञान हे केवळ साधन न राहता जागतिक राजकारणाचे एक अस्त्र बनले आहे. ए आय ही संगणकीय तंत्रज्ञानाची अशी शाखा आहे जी डेटा विश्लेषण, निर्णय-सहाय्य आणि स्वयंचलित प्रणाली विकसित करते. समाज जीवनाच्या कृषी, उद्योग, पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, राजकारण इत्यादी क्षेत्रांवर प्रभाव टाकताना दिसून येते. भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशामध्ये ए आय चे लोकशाही व्यवस्थेमध्ये, प्रक्रियेमध्ये सकारात्मक परिणाम होतील. परंतु जास्त प्रमाणात धोके निर्माण होण्याची शक्यता आहे लोकशाही प्रक्रिया म्हणजे नागरिकांच्या सहभागातून शासन चालवण्याची पद्धत होय. यामध्ये प्रामुख्याने निवडणुका, धोरण निर्मिती, जनमत, पारदर्शकता व जबाबदारी इत्यादीचा समावेश होतो. ए आय चे लोकशाही प्रक्रियेतील सकारात्मक परिणाम झाल्यास ते पुढीलप्रमाणे-

**१) निवडणूक व्यवस्थापन सुधारणा:-**

भारतात निवडणूक प्रक्रिया प्रामुख्याने भारतीय निवडणूक आयोगाद्वारे राबवली जाते. लोकशाही अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि कार्यक्षम करण्यासाठी निवडणूक व्यवस्थापनात सतत सुधारणा आवश्यक



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102

Website: www.relishpublications.com

Email: raavipublications@gmail.com

WhatsApp: 9665841996

ISSN:3108-253X
Special Issue : February,2026

RAAVI

An International Journal of Multidisciplinary Research

असतात. ए आय च्या माध्यमातून ईव्हीएम व व्हीव्हीपीएटी चा प्रभावी वापर, ऑनलाइन मतदार नोंदणी, सोशल मीडियावरील आचारसंहितेचे उल्लंघन रोखता येईल इ. तांत्रिक सुधारणांसाठी ए आय प्रभावी ठरेल. त्याचबरोबर राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देण्ग्यांची माहिती सार्वजनिक करता येईल, उमेदवारांच्या खर्चाचे नियमित ऑडिट व निवडणूक काळात होणाऱ्या गैरप्रकारांवर त्वरित कारवाई होवून निवडणूक व्यवस्थापनामध्ये पारदर्शकता येईल. गंभीर गुन्हयांमध्ये आरोपपत्र दाखल झालेल्या उमेदवारांवर निवडणूक लढवण्यास बंदी घातली पाहिजे व त्यासाठी कायद्यात आवश्यक ते बदल केले पाहिजेत. विशेष म्हणजे मतदारांना उमेदवारांच्या गुन्हेगारीची माहिती स्पष्टपणे उपलब्ध करून देण्यासाठी ए आय ची भूमिका खूप महत्त्वाची राहील. मतदारांचे राजकीय शिक्षण व राजकीय सहभाग जास्तीत जास्त प्रमाणावर घडून येणे यावरच लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते. यासाठी ए आय च्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात सहजपणे जनजागृती करता येईल.  शाळा, महाविद्यालयांमध्ये मतदानाचे महत्त्व समजावून सांगता येईल. ए आय मुळे खर्च व प्रशासकीय ताण कमी होवून एकाच वेळी निवडणुका घेता येतील. थोडक्यात, निवडणूक व्यवस्थापन सुधारणा म्हणजे केवळ तांत्रिक बदल नसून लोकशाही मूल्ये मजबूत व बळकट करण्याची प्रक्रिया आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि मतदारांचा सक्रिय सहभाग यामुळे निवडणूक प्रक्रिया अधिक विश्वासार्ह आणि प्रभावी होवू शकते.

**२) नागरिक सहभाग वाढविणे:-**

डिजिटल लोकशाही मजबूत करण्यासाठी ए आय चा वापर करून नागरिकांना शासनाच्या निर्णय प्रक्रियेत,सेवा वापरात आणि अभिप्राय देण्यात अधिक सक्रिय करणे सोपे होईल.ए आय द्वारे स्मार्ट तक्रार निवारण प्रणाली राबवून ए आय चॅटबॉट्स नागरिकांच्या तक्रारी त्वरित सोडवतील व वर्गीकृत करतील.त्याचप्रमाणे तक्रार व समस्या कोणत्या विभागाशी संबंधित आहे हे ए आय पटकन ओळखेल. थोडक्यात,ए आय चा वापर वैयक्तिक होऊन नागरिकांच्या गरजेनुसार योजना व सूचना सुचविल्या जातील,नागरिकांना त्यांच्या परिसराशी संबंधित माहिती मिळेल आणि साहजिकच सरकारी सेवा वापरणे



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102

Website: www.relishpublications.com

Email: raavipublications@gmail.com

WhatsApp: 9665841996

सोपे होईल.ए आय प्लॅटफॉर्ममुळे नागरिकांकडून निधी कुठे खर्च करावा यावर मत अजमावले जाईल व त्यामुळे पारदर्शकता वाढेल व नागरिकांना खऱ्या अर्थाने लोकशाही प्रक्रियेत सहभागी होता येईल.एकंदरीत,ए आय च्या प्रभावी वापरामुळे शासन आणि नागरिक यांच्यातील अंतर कमी होऊन नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढण्यास मदत होईल.

**३) धोरण निर्मितीत मदत:-**

ए आय धोरण निर्मिती प्रक्रियेला अधिक वैज्ञानिक,जलद आणि प्रभावी बनवू शकते.सरकारे आणि प्रशासकीय यंत्रणा योग्य निर्णय घेण्यासाठी ए आय चा मोठ्या प्रमाणावर उपयोग करू लागल्या आहेत. ए आय मोठ्या प्रमाणातील माहिती जलद गतीने विश्लेषित करते, लोकशाही व्यवस्थेत धोरण निर्मिती ही जनमत, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यावर आधारित असते. ए आय मुळे ही प्रक्रिया अधिक पुराव्यांवर आधारित, जलद आणि लोककेंद्रीत बनू शकते. थोडक्यात, ए आय लोकशाहीतील धोरण निर्मितीला अधिक स्मार्ट, पारदर्शक व लोकाभिमुख बनवू शकते.

**४) पारदर्शकता आणि कार्यक्षमता:-**

आजच्या डिजिटल युगात ए आय लोकशाही व्यवस्थेला अधिक पारदर्शक, जबाबदार आणि कार्यक्षम बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ए आय च्या साह्याने शासनाच्या योजना, निर्णय, खर्च आणि धोरणांची माहिती नागरिकांना त्वरित व सोप्या भाषेत उपलब्ध करता येते. उदा. My Gov India सारख्या प्लॅटफॉर्मवर नागरिक प्रत्यक्षपणे सहभाग नोंदवू शकतात. तसेच डेटा विश्लेषणाद्वारे संशयास्पद व्यवहार, अनियमितता आणि गैरव्यवहार शोधणे शक्य होते उदा. भारतीय निवडणूक आयोगाकडून होणारा निवडणूक खर्च व मतदानाच्या नमुन्यांचे विश्लेषण करून पारदर्शकता वाढवता येते. ई-गव्हर्नन्स सुधारणा, निर्णय प्रक्रियेतील मदत, तक्रार निवारण प्रणाली, निवडणूक व्यवस्थापन सुधारणा इत्यादी माध्यमातून ए आय लोकशाही प्रक्रियेला अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम बनवू शकते. निवडणूक व्यवस्थापन सुधारणा, वाढता

ISSN:3108-253X
Special Issue : February,2026
RAAVI
An International Journal of Multidisciplinary Research

नागरिक सहभाग, धोरण निर्मितीस मदत, पारदर्शकता आणि कार्यक्षमता इ. मुळे लोकशाही प्रक्रियेमध्ये सकारात्मक परिणाम होत असले तरी ए आय चे काही संभाव्य धोकेही आहेत ते पुढीलप्रमाणे-

**१) दिशाभूल:-**

ए आय तंत्रज्ञान लोकशाही प्रक्रियेला मदत करू शकते पण त्याचवेळी चुकीची माहिती आणि दिशाभूल करण्याचा धोका देखील वाढतो. ए आय चा वापर लोकशाही प्रक्रियेमध्ये केला गेल्यास बनावट बातम्या आणि फेक व्हिडिओ तयार होऊ शकतात की जेणेकरून मतदारांची दिशाभूल होण्याचा धोका वाढतो.

**२) मतप्रभाव आणि मनोविकृती:-**

आजच्या डिजिटल युगात ए आय लोकशाही प्रक्रियेत मोठी भूमिका बजावत आहे. निवडणुका, प्रचार, जनमत निर्मिती आणि नागरिक संवाद या सर्व क्षेत्रांमध्ये ए आय चा वापर वाढत आहे. मात्र यामुळे मतप्रभाव आणि मनोविकृती यासारख्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. विशिष्ट गटांना त्यांच्या विचारसरणीनुसार संदेश पाठवले जातात, खोट्या बातम्या जलद पसरवल्या जातात, चॅटबॉट्ससारखे कृत्रिम ट्रेंड तयार केले जातात यामुळे मतदारांची स्वतंत्र विचारशक्ती प्रभावित होऊ शकते आणि निवडणुकीतील निष्पक्षता धोक्यात येऊ शकते.

**३) गोपनीयतेचा भंग:-**

लोकशाही प्रक्रियेत नागरिकांची गोपनीयता अत्यंत महत्त्वाची असते.मतदान,राजकीय मत, वैयक्तिक माहिती हे मुक्त आणि निष्पक्ष लोकशाहीची मूलभूत तत्वे आहेत. मात्र  ए आय चा वापर वाढल्यास गोपनीयतेला काही गंभीर धोके निर्माण होऊ शकतात. ए आय प्रणालीमुळे नागरिकांचे ऑनलाईन वर्तन, सोशल मीडियाचा वापर, लोकेशन डेटा इत्यादी मोठ्या प्रमाणावर गोळा केला जातो यामुळे नागरिकांच्या राजकीय पसंतीचा अंदाज लावता येतो. तसेच ए आय च्या मदतीने मतदारांना वैयक्तिक राजकीय जाहिराती दाखवल्या जाऊ शकतात आणि मतदारांच्या मानसशास्त्रावर परिणाम करून त्यांचे मत प्रभावित केले जाऊ



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102

Website: www.relishpublications.com

Email: raavipublications@gmail.com

WhatsApp: 9665841996

ISSN:3108-253X
Special Issue : February,2026
RAAVI
An International Journal of Multidisciplinary Research

शकते. अनेकदा मतदारांना कळत नकळतपणे त्यांच्यावर प्रभाव टाकला जातो.सरकार आणि राजकीय पक्षांकडून नागरिकांवर नजर ठेवण्याचा धोका वाढतो एकंदरीत, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर दडपण येऊ शकते तसेच ए आय प्रणाली मोठ्या डेटावर आधारित असल्यामुळे डेटा चोरी किंवा गळतीचा धोका असतो त्यामुळे मतदारांची वैयक्तिक माहिती चुकीच्या हातात जाऊ शकते. ए आय निर्मित बनावट व्हिडिओ व ऑडिओंमुळे मतदारांची फसवणूक होऊ शकते एकूणच गोपनीयतेचा भंग होऊन मतदारांचा व पर्यायाने नागरिकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास कमी होतो.

**४) पक्षपात:-**

ए आय चा वापर निवडणुका,मतदार विश्लेषण,धोरण निर्मिती आणि नागरिक सहभाग वाढवण्यासाठी वाढत आहे. परंतु एआय प्रणाली मध्ये पक्षपात निर्माण झाल्यास लोकशाही प्रक्रियेची निष्पक्षता आणि विश्वासार्हता धोक्यात येऊ शकते. ए आय प्रणाली निर्णय घेताना काही गट, विचारसरणींकडे झुकते हा पक्षपात डेटामधून व मानवी पूर्वग्रहांमधून येऊ शकतो.राजकीय पक्ष ए आय चा वापर करून विशिष्ट मतदार गटांना लक्ष्य करू शकतात.काही समुदायांना कमी किंवा जास्त माहिती दिली जाऊ शकते आणि यामुळे साहजिकच मतदारांचे समान प्रतिनिधित्व बाधित होऊ शकते.

थोडक्यात ए आय हे लोकशाहीसाठी मोठे साधनही आहे आणि आव्हानही आहे. योग्य नियमन,पारदर्शकता आणि नागरिकांची जागरूकता असेल तर ए आय लोकशाही अधिक मजबूत करू शकते अन्यथा ए आय दिशाभूल आणि असमानतेचे साधन बनू शकते.

**संदर्भ:-**

१) लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया-डॉ.राजशेखर सोलापूरे, निराली प्रकाशन, पुणे, २००३.

२) आर्टिफिशियल इंटेलिजन्स-अच्युत गोडबोले, बुकगंगा प्रकाशन, २०२३.

३) आर्टिफिशियल इंटेलिजन्स-दीपक शिकारपूर, दिलीपराज प्रकाशन.



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102

Website: www.relishpublications.com

Email: raavipublications@gmail.com

WhatsApp: 9665841996

ISSN:3108-253X
Special Issue : February,2026
RAAVI
An International Journal of Multidisciplinary Research

४) भारतीय राज्यव्यवस्था-एम. लक्ष्मीकांत.

५) राजकारण जिज्ञासा-डॉ.सुहास पळशीकर, पुणे.

६) लोकशाही आणि शिक्षण- डॉ.जनार्दन वाघमारे.

❑❑❑



Relish Publications,
Amrapali Apartment, Canal
Road, Baramati (MS), India.
Pin code- 413102

Website: www.relishpublications.com

Email: raavipublications@gmail.com

WhatsApp: 9665841996